राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन २०१५-१६ करीता मंजूर प्रकल्पांसाठी ₹ २४.१५ कोटी निधीचे वितरण.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः राकृवि ०४१५/प्र.क्र. ३१/राकृवियो कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०४२
तारीख: ०५ जानेवारी, २०१६

वाचा :

१. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ७-१/२०१५-आरकेव्हीवाय, दि. १५ एप्रिल, २०१५
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, १७ एप्रिल, २०१५
३. कृषि विभागाचा शासन निर्णय क्र. राकृवि-०४१५/प्र.क्र.३१/राकृवियो कक्ष, दि. २२ मे, २०१५
४. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ५-१/२०१५-आरकेव्हीवाय, दि. २७ मे, २०१५
५. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०१५- आरकेव्हीवाय, दि. १६ जुलै, २०१५
६. वित्त विभागाचे परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३४/कोशा.प्रशा.५, दि.२४ जुलै, २०१५
७. वित्त विभागाचे परिपत्रक क्र.पूरक-२०१५/प्र.क्र.१४०/अर्थसंकल्प-३, ०१ ऑगस्ट, २०१५
८. कृषि विभागाचा शासन निर्णय क्र. राकृवि-०४१५/प्र.क्र.३१/राकृवियो कक्ष, दि. ३१ ऑगस्ट, २०१५
९. वित्त विभागाचे परिपत्रक क्र.पूरक-२०१५/प्र.क्र.१४०/अर्थसंकल्प-३, ०६ ऑक्टोबर, २०१५
१०.कृषि विभागाचा शासन निर्णय क्र.राकृवि-०४१५/प्र.क्र.३१/राकृवियो, दि.०६ नोव्हेंबर, २०१५
११.कृषि विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-१५१५/प्र.क्र.४९८/६-अे, दि.०३ डिसेंबर, २०१५
१२.कृषि विभागाचा शासन निर्णय क्र.राकृवि-०४१५/प्र.क्र.३१/राकृवियो, दि.०४ डिसेंबर, २०१५

प्रस्तावना :

११ व्या पंचवार्षिक योजनाकाळात कृषि व कृषि संलग्न क्षेत्राचा विकास दर ४% साध्य करण्याकरीता केंद्र शासनाने सन २००७-०८ या वर्षापासून राष्ट्रीय कृषि विकास योजना सुरु केलेली आहे. सदरची योजना १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्येही राबविण्यात येत आहे. सदरहू योजनेचा केंद्र शासनाकडून उपलब्ध झालेला निधी जमा करण्याकरिता आयुक्त (कृषि) यांचे नावे नवीन स्वीय प्रपंजी लेखा खाते (Personal Ledger Account) उघडण्यात आलेले आहे.

सन २०१५-१६ पासून केंद्र शासनाने कृषि उन्नती योजनेच्या अंतर्गत राष्ट्रीय कृषि विकास योजना केंद्र व राज्य शासनाच्या ५०: ५० अर्थसहाय्याने राबविण्याबाबत संदर्भांकित दि. २७/०५/२०१५ रोजीच्या पत्रान्वये अंतरीम प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. केंद्र शासनाने दि. १५/०४/२०१५ आणि दि.२७/०५/२०१५ रोजीच्या पत्रान्वये राज्याकरीता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत केंद्र हिस्याचे अनुक्रमे 'सर्वसाधारण राकृवियो (Normal RKVY)' करीता ₹ ३११.६२ कोटी रकमेचे व विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमाकरीता (VIIDP) ₹ ७५ कोटी रकमेचे असे एकूण ₹ ३८६.६२ कोटी रकमेचे केंद्र हिस्याचे नियतवाटप (Allocation) चालू वर्षाकरीता जाहीर केले आहे. त्यानुषंगाने समरुप ५० % राज्य हिस्सा म्हणून राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्य शासनाचा ₹ ३८६.६२ कोटी आर्थिक सहभाग अपेक्षित आहे. अशाप्रकारे चालू वर्षी राष्ट्रीय कृषि विकास योजनेकरीता एकूण ₹ ७७३.२४ कोटी निधी उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

केंद्र शासनाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत केंद्र हिस्सा म्हणून पहिल्या हफ्त्यात संदर्भांकित दि. १६.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये ₹१९३.३१ कोटी निधी वितरीत केला आहे. त्यानुषंगाने, समरुप राज्य हिस्सा ₹१९३.३१ कोटी गृहीत धरता एकूण ₹३८६.६२ कोटी निधी राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत वितरीत करणे शक्य आहे.

यापूर्वी संदर्भ क्र.३,८,१०,१२ येथील शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या प्रकल्पांना एकूण ₹ ३२३.२४५१ कोटी निधी वितरीत केले आहेत. त्यानुषंगाने सदर प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत चालू वर्षी ₹ २४.१५ कोटी निधी वितरीत करण्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे -

शासन निर्णयः

१. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी सन २०१५-१६ करीता एकूण ₹ २४.१५ कोटी (रुपये चोवीस कोटी पंधरा लाख फक्त) निधी या शासन निर्णयान्वये आयुक्त (कृषि), पुणे यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे पुढीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत, आयुक्त कृषि यांनी सदर निधी कोषागारातून आहरीत करुन खालील अंमलबजावणी यंत्रणेस तात्काळ उपलब्ध करुन द्यावा.

(₹ कोटी)

अ.क्र.	अंमलबजावणी यंत्रणा	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	एकूण वितरीत निधी
१	महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला	१२.०७५	१२.०७५	२४.१५

२. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या ₹ २४.१५ कोटी रक्कमेचे कोषागारातून आहरण व वितरणाकरिता सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध झालेली ₹ २४.१५ कोटी रक्कम कोषागारातून आहरित करुन आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी लेखा खाते (Personal Ledger Account) मध्ये जमा करावी व तसे शासनास अवगत करावे.

४. आयुक्त (कृषि) यांनी त्यांना वितरीत करण्यात येत असलेल्या एकूण ₹ २४.१५ कोटी निधीचे या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या अंमलबजावणी यंत्रणांच्या मंजूर प्रकल्पांना वितरण करावयाचे आहे.

५. राष्ट्रीय कृषि विकास योजनेकरीता या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात येत असलेला ₹ २४.१५ कोटी (रुपये चोवीस कोटी पंधरा लाख फक्त) निधी सन २०१५-१६ करिता खालील लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा.

मागणी क्रमांक डी -३
२४०१- पीक संवर्धन
(००) (८००) इतर खर्च
(००) (०९) राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य
(२४०१ ८२३५) योजनांतर्गत/दत्तमत
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
(१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना)
३३-अर्थसहाय्य

६. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या निधीचे तात्काळ उपयोजन होण्याच्यादृष्टीनेच निधी कोषागरातून आहरीत करावा आणि सर्व विभागांनी त्यांना प्राप्त होणा-या निधीचा तात्काळ विनियोग करावा तसेच, अंमलबजावणी यंत्रणांनी सदर निधी उपयोजनाविना बँक खात्यामध्ये जमा करुन ठेवू नये.

७. केंद्र शासनाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन २००७-०८ पासून सन २०१४-१५ पर्यंत विविध विभागांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचे लेखापरीक्षण होऊन तसे प्रमाणित केल्यासच सदर योजनेंतर्गत उर्वरीत निधी दुसऱ्या टप्प्यामध्ये वितरीत करण्यात येईल, असे निर्देशीत केलेले आहे. यास्तव सन २००७-०८ ते २०१४-१५ या कालावधीत सर्व अंमलबजावणी यंत्रणांना/विभागांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचे लेखापरीक्षण होऊन लेखा आक्षेपांची पूर्तता केली असली तरच संबंधित यंत्रणांना दुसऱ्या टप्प्यातील निधी वितरीत करण्यात येईल.

सबब, सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी/विभागांनी त्यांना सन २००७-०८ ते सन २०१४-१५ या कालावधीत वितरीत करण्यात आलेल्या निधीचे लेखापरिक्षण झाल्याचे प्रमाणित करावे.

८. वित्त विभागाच्या दि.१७ एप्रिल, २०१५, दि. २४ जुलै, २०१५ व दि.०६ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकातील अटींची पुर्तता करुन तसेच वित्त विभागाच्या या परिपत्रकांन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०५१२१६४४६००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सहपत्र : परिशिष्ट- अ

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2016.01.05 12:22:43 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. व्यवस्थापक संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला
७. संचालक (नियोजन व प्रक्रिया), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
८. संचालक (नि. व गु.), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
९. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
१०.महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
११.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
१२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१३.सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१४.कक्ष अधिकारी/ अवर सचिव, ६-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
१६. मा. मंत्री (कृषि व पदुम) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१७. निवड नस्ती.

परिशिष्ट-अ

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्र.
राकृवि-०४१५/प्र.क्र.३१/राकृवियो कक्ष, दि.०५/०१/२०१६ चे सहपत्र

महाबीजच्या मंजूर प्रकल्पांना ₹ २४.१५ कोटी निधीचे प्रकल्प निहाय वितरण

(रक्कम ₹ कोटी)

अ.क्र.	संस्थेचे / प्रकल्पाचे नांव	प्रकल्प मंजूरीचे वर्ष	मुळ मंजूर प्रकल्प किंमत	सन २०१५-१६ करीता उर्वरित प्रकल्प किंमत	सन २०१५-१६ करीता मंजूर नियतवाटप	या शासन निर्णयान्वये वितरीत निधी
१	बीज प्रक्रिया केंद्र इमारत व बियाणे साठवणूकीसाठी गोदामाचे बांधकाम	२०१३-१४	१२.९८००	३.००००	३.००००	२.५०००
२	सार्वजनिक क्षेत्रातल्या संकरीत कपाशी बियाण्यामध्ये बिटीचा शिरकाव करुन संकरीत कपाशी बियाण्याचा विकास करणे.	२०१४-१५	२.०६००	१.२६००	०.७५००	०.७५००
३	उत्पादनवाढ क्षेत्र प्रकल्प नवीन जातीच्या कडधान्य, गळीत धान्य, तृण धान्य व भाजीपाला बियाण्याचे पायाभुत व प्रमाणित बियाणे उत्पादन व वितरण करणे	२०१५-१६	२०.३८००	२०.३८००	२०.३८००	२०.००००
४	बियाणे साठवणूकीकरीता १००० मेट्रीक टन क्षमतेचे बियाणे उत्पादन करुन त्याची साठवणूक करण्याकरीता वातानुकूलीत व आद्रतारहीत बियाणे भांडाराचे बांधकाम, अकोला.	२०१५-१६	१.८०००	१.८०००	१.८०००	०.९०००
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला		**एकूण**	**३७.२२००**	**२६.४४००**	**२५.९३००**	**२४.१५००**